सत्यमेव जयते

# नागरिकांची सनद

# रत्नागिरी पत्तन विभाग

## रत्नागिरी कार्यालयाची माहिती

## सन - २०१८



# अनुक्रमणिका



| अनु.क्र. | तपशिल | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|
| १ | प्रस्तावना | २ ते ७ |
| २ | पत्तन अभियंता रत्नागिरी, पत्तन विभाग, रत्नागिरी कार्यालयाची बांधिलकी व नागरिकांची जबाबदारी | ८ ते ९ |
| ३ | पत्तन अभियंता रत्नागिरी पत्तन विभाग, रत्नागिरी कार्यालयाची रचना | १० ते ११ |
| ४ | कार्यालयाचे कार्यक्षेत्र | १२ |
| ५ | विभागांतर्गत माहितीची सुलभता | १२ |
| ६ | गाऱ्हाण्यांचे निराकारण सनदेचा आढावा व जनसामान्यांची छानन. | १३ |
| ७ | नागरिकांच्या सनदेची अंमलबजावणी | १४ |
| ८ | परिशिष्टे | १६ ते १९ |


# प्रस्तावना

महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम विभागांतर्गत मुख्य अभियंता, (वि.प्र.) सा.बां. विभाग, मुंबई हा प्रादेशिक विभाग येत असून त्या विभागांतर्गत किनारी अभियंता, मुंबई हे मंडळ कार्यालय कार्यरत आहे. सदर मंडळ कार्यालयाअंतर्गत तीन पत्तन विभाग कार्यरत असून त्यापैकी रत्नागिरी जिल्हयासाठी पत्तन विभाग, रत्नागिरी हे कार्यालय दिनांक २९/०४/१९५४ पासून निर्माण करण्यात आले. त्यावेळी सदर कार्यालय हार्बर इंजिनियर मरीन डिव्हीजन रत्नागिरी नावाने कार्यरत होते. तदनंतर पत्तन विभाग, रत्नागिरी या नावाने हे कार्यालय कार्यरत असून हा विभाग रत्नागिरी जिल्हयातील समुद्र किना-यावरील व खाडीपटटीतील मच्छिमार नागरिकांशी बांधिलकी जपण्यास कटीबध्द आहे. ही बांधिलकी या सनदेव्दारे जाहीर करत असून ती स्विकारीत आहे. रत्नागिरी पत्तन विभाग, रत्नागिरी या विभागाने निर्धारित केलेल्या व पथदर्शित केलेल्या सार्वजनिक सेवा तत्परतेने सौजन्यपूर्वक व सन्मानपुर्वक वागणुकीने उपलब्ध व्हाव्यात व नागरिकांचे सामाजिक प्रश्न सहानुभतीपुर्वक सोडवावेत हा दृष्टीकोन विचारात घेऊन तसेच सर्व सामान्य नागरिकांसाठी ही सनद तयार करण्यात आली आहे.

**(हा विभाग रत्नागिरींकरांना खालील सुविधा पुरविण्यास बांधिल आहे.)**



१. रत्नागिरी जिल्हयातील समुद्र किना-यालगतच्या भागास लाटांपासुन बचाव करण्यासाठी धुपप्रतिबंधक बंधारे बांधुन किनारपटटीचे संरक्षण करणे व किनारपटटीवर तसेच खाडीलगत मच्छिमार बंदरे, बोटी थांबविण्यासाठी जेटटी व मत्स्यव्यवसायाच्या विकासासाठी सुविधा केंद्रे बांधणे.




२. या विभागाच्या कार्यक्षेत्रांतर्गत असलेल्या बंदर व मत्स्यव्यवसाय खात्याच्या इमारती, रस्ते यांची नियतकालीक देखभाल व दुरुस्ती उपलब्ध होणा-या निधीतून प्रभावीपणे करणे व सेवा सुविधांचा स्तर उंचावत ठेवणे.



३. या विभागाच्या कार्यालयाशी संलग्न असलेल्या इतर सर्व शासकीय विभागांना तांत्रीक सल्ला देणे व शासकीय कामकाजात सुसुत्रता आणणे.



४. या विभागाच्या कार्यालयात व विभागाच्या अखत्यारीतील सर्व कार्यालयात प्रतिसाद वेळापत्रक प्रदर्शित करणे.

५. आपत्कालिन व्यवस्थेसाठी तत्परतेने अभियांत्रिकीशी संबंधित आवश्यक ती कामे करणे व मदत करणे.



६. या विभागाच्या कार्यालयात व विभागाच्या अखत्यारीतील सर्व कार्यालयातून कर्मचारी वर्गाची कर्तव्य व जबाबदाऱ्या फलकावर जाहिररित्या प्रदर्शीत करणे.



७. या विभागाच्या कार्यालयात व विभागाच्या अखत्यारितील प्रत्येक कार्यालयात ठरवून दिलेल्या दिवशी व वेळी सर्वसामान्य जनतेची गाऱ्हाणी / तक्रारी ऐकणे व त्यांचे प्रभावीपणे निराकरण करणे.

८. माहितीचा अधिकार अधिनियम अंतर्गत हया विभागाच्या अखत्यारीतील मागीतलेली माहिती संबंधीतांना विहित मुदतीत उपलब्ध करुन देणेबाबत कार्यवाही करणे.



९. कार्यालयाच्या कामकाजात सातत्य ठेऊन व आधुनिकता आणून हया विभागाच्या कार्यालयाची व सा.बां. खात्याची लोकाभिमुखता वाढविणे.




१०. संगणकीकरणाबाबत हया विभागाच्या सर्व उपविभागीय कार्यालये यांना अवगत करणे व मंडळ कार्यालय, प्रादेशिक कार्यालय व मंत्रालय यांना नेटवर्कव्दारे आवश्यक व तातडीची माहिती त्वरीत उपलब्ध होण्यासाठी प्रयत्नशिल राहणे.

११. या विभागांतर्गत आवश्यक व अद्यावत माहिती त्वरीत सार्वजनिक बांधकाम (खाते) विभागवार www.mahapwd.com या संकेतस्थळावर (वेबसाईटवर) उपलब्ध करणे व अद्यावत करणे.





१२. सर्व विषयाची अनसुची तयार करणे व निपटारा करणेचा विहीत कालावधी ठरविणे.

१३. कार्यालयामध्ये राजीव गांधी अभियांनांतर्गत सर्व अभिलेख अद्यावत करणे व त्याची वर्गवारी करुन अभिलेख कक्ष नोंदवहीसह अद्यावत करणे.

१४. नागरिकांच्या सनदेस व्यापक प्रसिध्दी देणे.



# २. रत्नागिरी पत्तन विभाग, रत्नागिरी कार्यालयाची बांधिलकी व नागरिकांची जबाबदारी.

## वरील सर्व कर्तव्ये पार पाडतांना रत्नागिरी पत्तन विभाग, रत्नागिरी

अ) सेवेच्या गुणवत्तेची बांधिलकी ठेवील.

ब) सौजन्यपूर्ण व आपुलकीची भावना ठेऊन कामाचा वेळेत निपटारा करेल.

क) पारदर्शकता व निष्ठा ठेवील, यासाठी वेळोवेळी परवानापत्रे / प्रमाणपत्रे/ना-हरकत प्रमाणपत्रे मिळविण्यासाठी कार्यपध्दती, पत्रके नागरिकांच्या माहितीसाठी उपलब्ध करण्यात येतील.

## नागरिकांची जबाबदारी

- शासकीय अधिकारी / कर्मचारी यांचेशी नागरिकांची वर्तणूक सौजन्यपूर्ण असावी.
- नागरिकांकडून आवश्यक असलेली माहिती व कागदपत्रे परिपूर्णरित्या मिळावी.
- नागरिकांचा प्रतिसाद विकासाला मदत करणारा असावा.
- विहीत केलेल्या कालावधीपेक्षा कमी कालावधीत सेवा पुरविण्याचा आग्रह धरु नये.
- सार्वजनिक मालमत्तेची व्यवस्था पाहण्यास सहकार्य करावे.
- नागरिकांनी स्वेच्छेने अतिक्रमणे दूर करावीत व पुन्हा सरकारी जागांवर अतिक्रमणे करु नये.

- समुद्र व खाडी लगतच्या किनारपटटया प्रदुषणमुक्त ठेवण्यास मदत करावी.



- रस्त्याच्या दोन्ही बाजूंना असणा-या वृक्षराजींचे जतन ही नागरिकांचीसुध्दा जबाबदारी राहील.



- नागरिकांनी कायदेशीर तरतुदी, नियम, अलिखीत संकेत यांचे पालन करावे
- नागरिकांनी सार्वजनिक हित, एकात्मता व अखंडता जोपासण्यासाठी सहकार्याची भावना ठेवावी.

# ३. रत्नागिरी पत्तन विभाग, रत्नागिरी कार्यालयाची रचना.

सार्वजनिक बांधकाम विभागाच्या जिल्हा स्तरावरील पत्तन अभियंता, रत्नागिरी पत्तन विभाग, रत्नागिरी कार्यालय शासनाने दि. २९/०४/१९५४ रोजी स्थापन केले आहे. या विभागांतर्गत अनुक्रमे

१) सहाय्यक पत्तन अभियंता, पाणलोट बंधारा उपविभाग, रत्नागिरी

२) सहाय्यक पत्तन अभियंता, भगवती बंदर उपविभाग, रत्नागिरी


३) सहाय्यक पत्तन अभियंता, खाण व सर्व्हेक्षण उपविभाग, रत्नागिरी


४) सहाय्यक पत्तन अभियंता, पत्तन उपविभाग, दापोली

अशी एकूण चार उपविभागीय कार्यालये आहेत. रत्नागिरी जिल्हयातील समुद्र किनारपटटीवरील धुपप्रतिबंधक बंधारे, बंदर, जेटटी व त्यांना जोडणारे रस्ते व मत्स्यव्यवसाय विभागाकडील अनिवासी व निवासी इमारती बांधणे व देखभालीचे काम या विभागाच्या कार्यक्षेत्रात येते.

रत्नागिरी पत्तन विभाग यांचे कार्यक्षेत्राचा नकाशा व सहाय्यक पत्तन अभियंता यांची मुख्यालये दर्शविणारा वृक्ष - तक्ता (Tree Chart) परिशिष्ट अ म्हणून सोबत जोडला आहे.

प्रस्तावनेत नमूद केलेल्या सार्वजनिक सेवा सार्वजनिक बांधकाम विभाग पुरवित असतो. या विभागांतर्गत कामांच्या अंमलबजावणीसाठी सा.बां. नियमावली व लेखा संहिता, विनिर्देश, वेळोवेळी निगर्मित केलेले शासन निर्णय, परिपत्रके इत्यादिचे काटेकोरपणे पालन केले जाते.





कोकणपटटयातील रत्नागिरी जिल्हयास बाणकोट खाडी ते विजयदुर्ग खाडीपर्यंत एकूण २३८ कि.मी. लांबीची किनारपटटी लाभलेली आहे. ही किनारपटटी सुरक्षीत ठेवणेसाठी तसेच समुद्राच्या लाटांपासून होणारे नुकसान टाळण्यासाठी धुपप्रतिबंघक बंधारे बांधून किनारपटटीचे संरक्षण करणे व किनारपटटीवर आवश्यक त्या ठिकाणी मोठी व लहान बंदरे बांधणे तसेच मच्छिमारी बंदरे व त्यांचेसाठी जोडरस्ता बांधणे, दीपगृहे बांधणे, लाटरोधक भिंत बांधणे, बंदरातील गाळ काढणे, खाडी वरील प्रवासी बोट लावणेकरिता जेटटी व धक्का बांधणे व प्रवासी सुखसोई साठी प्रवासी निवारा, पाण्याच्या सोयी, प्रसाधनगृह बांधणे, स्थापत्य अभियांत्रिकी कामे तसेच मत्स्यव्यवसायासाठी विविध सुविधा निर्माण करणे जसे ओटा, रॅम्प, लिलावगृहे इत्यादी कामे या विभागामार्फत केली जातात. या व्यतिरिक्त पर्यटनामार्फत किनारपटटीवरील कामे सुध्दा केली जातात.

# ४. कार्यालयाचे कार्यक्षेत्र

रत्नागिरी पत्तन विभाग यांचे कार्यक्षेत्राखाली

**१. मंडणगड,**

**२. दापोली,**

**३. खेड,**

**४. गुहागर,**

**५. चिपळूण,**

**६. संगमेश्वर,**

**७. रत्नागिरी,**

**८. राजापूर,**

**९. लांजा**



हे तालुका येत असून त्या तालुक्यातील किनारपटटीचे संरक्षण करणेसाठी समुद्र धुपप्रतिबंधक बंधारे बांधणे व जेटटी बांधणे तसेच मत्स्यव्यवसायासाठी संबंधित इमारती बांधणे या कामांचा समावेश आहे. तसेच बाणकोट, दाभोळ, जयगड,राजिवडा, पुर्णगड, साखरीनाटे, जैतापूर व विजयदूर्ग खाडीतील प्रवाशांसाठी तसेच मच्छिमारांसाठी लागणा-या विविध प्रकारच्या सुखसोयींची कामे या विभागामार्फत करण्यात येतात.

# ५. विभागांतर्गत माहितीची सुलभत्ता -

विभागाचे वेबसाईटवरुन (संकेतस्थळावरुन) तसेच वेळोवेळी प्रसिध्द केल्या जाणा-या फलकाव्दारे जनतेच्या आकडेवारीचा तपशील सुलभतेने उपलब्ध होईल.

# ६. गाऱ्हाण्यांचे निराकरण सनदेचा आढावा व जनसामान्यांची छाननी.

## अ) गाऱ्हाणी / तक्रारी यांचे निराकरण :-

कार्यपूर्तीस होणारा विलंब वा अन्य काही गा-हाणी विभागाबाबत अथवा काही कामाबाबत तक्रारी असतील तर, ते गा-हाणी / तक्रारी त्या कार्यालयाच्या वरिष्ठ कार्यालयाकडे मांडावे.

उदा. नागरिकांना उपविभागीय कार्यालयाविरुध्द गा-हाणे/तक्रार असल्यास विभाग कार्यालय प्रमुखाकडे म्हणजे कार्यकारी अभियंता/पत्तन अभियंता यांचेकडे गा-हाणे मांडावे व विभाग कार्यालयाविरुध्द गा-हाणे/तक्रार असल्यास मंडळ कार्यालयाच्या अधिक्षक अभियंत्याकडे/किनारी अभियंत्याकडे गा-हाणे मांडावे. अशा गा-हाणी/तक्रारींचे निराकरण वरिष्ठ कार्यालयाकडून ७ दिवसात करण्यात येईल.



## ब) नागरिकांच्या सनदेचा आढावा / सिंहावलोकन :-

या विभागाच्या नागरिंकाचा सनदेच्या उपयुक्ततेबाबतचा तथा परिणामकारकतेचा आढावा या विभागाकडून घेण्यात येईल.

**क) जनसामान्याकडून सुचना :-**

या विभागाची सनद सर्वसामान्य नागरिकांच्या छाननीसाठी नेहमीच खुली असेल व सन्माननीय नागरिकांच्या बहुमूल्य सुचनांचा गांभिर्यपूर्वक विचार करुन, त्यांत वेळोवेळी सुधारणा घडवून आणता येईल. ही नागरिकांची सनद



स्वतःहून काही नविन कायदेशिर हक्क निर्माण करीत नाही ती ग्राहकांना म्हणजेच सा.बां. विभागाच्या सेवा उपभोगणा-यांना जादा हक्क मांडण्यासाठी मदत करते.

## ७) नागरिकांच्या सनदेची अंमलबजावणी :-

सार्वजनिक बांधकाम विभागाच्या या नागरिकांच्या सनदेची अंमलबजावणी दिनांक १ जुन २००७ पासून करण्यास विभागीय कार्यालय कटिबध्द आहे. सनदेस व्यापक प्रसिध्दी देऊ, नागरिकांच्या प्रतिक्रिया / अभिप्राय मागविण्यात येतील व त्यांच्या सूचनांचा यथोचित आदर करुन आवश्यक बदल करण्यात येतील. हा विभाग खात्रीपूर्वक गुणवत्तापुर्ण सेवा पुरविण्याची हमी देत आहे. ग्राहक केंद्रित सेवेची उद्दिष्टे प्राधान्याने अंगीकारुन ग्राहकांना त्वरीत प्रतिसाद दिला जाईल.

विभागाच्या कुठल्याही माहितीसाठी नागरिकांना सौजन्यपूर्ण व मदत करण्याच्या भावनेने वर्तणूक मिळेल. कार्यपध्दती अधिक लोकाभिमूख, सुलभ व आटोपशिर करण्यासाठी नागरिकांचा सल्ला घेतला जाईल. भ्रष्टाचारास आळा घालण्यात येईल. तसेच नागरिकांच्या गा-हाण्यांचे कालबध्द निकराकरण करण्यात येईल.





## ८. परिशिष्टे :-

अ) कार्यालये दर्शविणारा वृक्ष तक्ता
(Tree Chart)


ब) कार्यक्षेत्राचा नकाशा.








# कार्यालये दर्शविणारा वृक्षतक्ता




पत्तन अभियंता
रत्नागिरी पत्तन विभाग, रत्नागिरी
सहाय्यक पत्तन अभियंता
खाण व सर्वेक्षण उपविभाग, रत्नागिरी
सहाय्यक पत्तन अभियंता
भगवती बंदर उपविभाग, रत्नागिरी
सहाय्यक पत्तन अभियंता
पाणलोट बंधारा उपविभाग, रत्नागिरी
सहाय्यक पत्तन अभियंता
पत्तन उपविभाग, दापोली, रत्नागिरी

# रत्नागिरी जिल्हा

